# लक्ष्मी अर्बन को-ऑप बँक लि., लातूर

मुख्य कार्यालय : १६/७, कव्हा रोड, मार्केट यार्ड, लातूर - ४१३५१२
फोन क्र.:(०२३८२) २५१७५३, २५९७५३ फॅक्स क्र.(०२३८२) २५०७५३
ई-मेल : laxmi_urban@yahoo.com वेबसाईट : www.lucbank.in


## ऑनलाईन पद्धतीने घ्यावयाच्या २५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेसंबंधी विशेष सूचना :

1) २५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस ऑनलाईन पद्धतीने उपस्थित राहण्यासाठी सभासदांना त्यांच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांक वरती मिटिंगचा Login ID आणि Password SMS द्वारे सभेच्या ७ दिवस आगोदर पाठविण्यात येईल.

2) सक्षम इंटरनेट सेवा उपलब्ध असलेले संगणक/लॅपटॉप/स्मार्टफोन याद्वारे या वार्षिक सर्वसाधारण सभेस सभासद उपस्थित राहू शकतील.

3) दि. ३० सप्टेंबर २०२१ रोजी सभेच्या निर्धारित वेळेपूर्वी ३० मिनिटे आधी म्हणजे ३:०० पासून उपलब्ध करून दिलेल्या मिटिंगचा Login ID आणि Password वापर करून सभासदांनी लॉगइन करावे.

4) काही अनपेक्षित परिस्थितीत उदा ; तांत्रिक कारणामुळे सदर वार्षिक सर्वसाधारण सभेचे कामकाज खंडित झाल्यास, त्रुटींचे निवारण झाल्यानंतर त्याच लिंकवर लगेचच सभेचे कामकाज पुढे सुरु केले जाईल, याची सभासदांनी कृपया नोंद घ्यावी.

5) दि. ३० सप्टेंबर २०२१ रोजी वार्षिक सभेचे कामकाज सुरु होण्यापूर्वी ऑनलाईन पद्धतीने सभासदांसाठी प्रशिक्षणचे आयोजन केलेलं आहे त्याचा सर्व सभासदांनी लाभ घ्यावा.

6) सभासदांना लॉगइन बाबत काही तांत्रिक अडचणी असल्यास खालील मोबाईल क्रमांकवर दि. ३० सप्टेंबर २०२१ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी २.३० या वेळेत संपर्क साधावा. त्यांचेकडून लॉगइन अथवा पासवर्ड बाबत काही अडचणी/प्रश्न असतील, तरच त्या सोडविल्या जातील. सभासदांच्या इंटरनेट कनेक्शन बाबत काही अडचणी असतील तर त्या सोडविणे शक्य होणार नाही.

श्री. सुहास राजमाने - ७७७००१४९१७
श्री. सुशील जोशी - ७७७००१४९२१

7) सर्वप्रथम सभेच्या विषय पत्रिकेतील सर्व विषय सभेपुढे मांडण्यात येतील व त्यानुषंगाने ठराव पारित करण्यात येतील. त्यानंतर ऑनलाईन पद्धतीने सभेस उपस्थित राहणाऱ्या सभासदांना सभेच्या विषयासंबंधीचे प्रश्न विचारता येतील व त्याची उत्तरे 'Live' पद्धतीने त्याचवेळी देण्यात येतील.

*********